Epaper

डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल

MSME - MH-33 -0714843

# दैनिक जन सम्राट टाईम्स


सत्याचे प्राईम्स

मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

। गुरुवार, दि. २३ जूलै २०२६ । वर्ष १ ।अंक १०५ ।पाने २ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306 DIGITAL EDITION


धुळे येथे धावत्या शिवशाही बसला आग

(पान २ वर)



» Selected

## नाशिराबादमधील HDFC बँकेत चोरट्यांचा धाडसी डाव!

**नाशिराबाद :** नाशिराबाद शहरातील तरसोद फाट्याजवळ असलेल्या HDFC बँकेत अज्ञात चोरट्यांनी मध्यरात्री धाडसी घरफोडी करून चोरीचा प्रयत्न केल्याची घटना समोर आली आहे. चोरट्यांनी बँकेच्या मागील बाजूची भिंत फोडून आत प्रवेश केला आणि तिजोरी फोडून रोकड लंपास करण्याचा प्रयत्न केला. मात्र, चोरट्यांचा हा डाव फसला असून त्यांच्या हाती कोणतीही रक्कम लागली नसल्याची प्राथमिक माहिती आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. याप्रकरणी HDFC बँकेचे व्यवस्थापक वसीद अली सय्यद (वय ४५) यांनी नाशिराबाद पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, २० जुलै रोजी रात्री बँकेचे नियमित कामकाज आटोपल्यानंतर सर्व कर्मचारी बँक बंद करून घरी गेले होते.

### सरकार-'सीजेपी'मध्ये चर्चेची प्रक्रिया सुरू; ; धर्मेंद्र प्रधानांच्या राजीनाम्याच्या मागणीवर आंदोलक ठाम

# जंतर-मंतर आंदोलन अधिक तीव्र!

## राहुल गांधींचा पाठिंबा, विरोधकांचा सरकारवर हल्लाबोल

जन सम्राट टाईम्स

**नवी दिल्ली | प्रतिनिधी :** दिल्लीतील जंतर-मंतरवर सुरू असलेल्या विद्यार्थी आंदोलनाने बुधवारी आणखी तीव्र रूप धारण केले. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याशिवाय आंदोलन मागे घेणार नाही, अशी ठाम भूमिका आंदोलकांनी घेतली असून, त्यांना विरोधी पक्षांचाही पाठिंबा मिळू लागल्याने केंद्र सरकारची कोंडी वाढली आहे. महिनाभर संवाद टाळल्यानंतर केंद्र सरकारने अखेर आंदोलकांशी चर्चा सुरू केली असून केंद्रीय आरोग्यमंत्री जे. पी. नड्डा यांनी आंदोलनकर्त्यांच्या प्रतिनिधींशी बैठक घेऊन तोडगा काढण्याचा प्रयत्न केला.

आंदोलनाचे नेतृत्व करणाऱ्या **कॉक्रोच जनता पार्टी (सीजेपी)**ने सरकारसमोर तीन प्रमुख मागण्या ठेवल्या आहेत. त्यामध्ये धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा, आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी एक कोटी रुपयांची आर्थिक मदत आणि आंदोलकांवर कोणतीही फौजदारी कारवाई न करण्याची हमी यांचा समावेश आहे. या मागण्या लेखी स्वरूपात मान्य झाल्याशिवाय आंदोलन मागे घेणार नसल्याचा इशारा सीजेपीने दिला आहे.

### सरकारची कोंडी, चर्चेला वेग

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या निवासस्थानी केंद्रीय मंत्री जे. पी. नड्डा, जितेंद्र सिंह, धर्मेंद्र



प्रधान तसेच भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन यांची बैठक झाली. या बैठकीत आंदोलनावर तोडगा काढण्यासाठी रणनीतीवर चर्चा करण्यात आली. त्यानंतर सरकारच्या प्रतिनिधींनी सीजेपीच्या पदाधिकाऱ्यांशी तटस्थ स्थळी चर्चा केली.

सीजेपीच्या प्रतिनिधींनी स्पष्ट केले की, सरकारविरोधात नवा मोर्चा काढला जाणार नाही; मात्र जंतर-मंतरवरील आंदोलनही मागे घेतले जाणार नाही. सरकारनेच चर्चेसाठी पुढाकार घ्यावा, अशी भूमिका त्यांनी कायम ठेवली.

### सोनम वांगचुक यांची भेट

दरम्यान, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांची केंद्रीय मंत्री जे. पी. नड्डा यांनी मेदांता रुग्णालयात जाऊन भेट घेतली. विद्यार्थ्यांवर कोणतीही कारवाई होणार नाही आणि संसदेत 'नीट' परीक्षेच्या प्रश्नावर सविस्तर चर्चा होईल, अशी हमी मिळाल्यास उपोषण मागे घेण्यास तयार असल्याचे वांगचुक यांनी सांगितल्याची माहिती सूत्रांनी दिली.

### राहुल गांधींचा सरकारवर निशाणा

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पत्रकार परिषदेत केंद्र सरकारवर जोरदार टीका केली. धर्मेंद्र प्रधान यांचा तातडीने राजीनामा, आंदोलक विद्यार्थ्यांवर कारवाई करणाऱ्या पोलिसांवर शिस्तभंगाची कारवाई आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विद्यार्थ्यांची माफी मागावी, अशा तीन प्रमुख मागण्या त्यांनी केल्या. परीक्षा प्रणाली आणि शिक्षण व्यवस्थेत व्यापक सुधारणा करण्याची गरज असल्याचे सांगत, विद्यार्थ्यांच्या हक्कांसाठी काँग्रेस संसदेत आणि रस्त्यावरही लढा सुरू ठेवेल, असे राहुल गांधी यांनी स्पष्ट केले. राहुल गांधी यांनी गेल्या दहा वर्षांत देशभरात १५२ पेपरफुटीच्या घटना घडल्याचा दावा केला. या घटनांमुळे सुमारे ७.५ कोटी विद्यार्थी आणि त्यांच्या कुटुंबीयांवर परिणाम झाला असून, अद्याप एकाही आरोपीला कठोर शिक्षा झालेली नसल्याचा आरोप त्यांनी केला.

### मुंबईत ९०० हून अधिक विद्यार्थ्यांवर गुन्हे

दिल्लीतील कारवाईच्या निषेधार्थ मुंबईतील दादर येथे काढण्यात आलेल्या मोर्चादरम्यान हजारो विद्यार्थ्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले. त्यापैकी ९०० हून अधिक विद्यार्थ्यांविरोधात गुन्हे दाखल करण्यात आल्याचा आरोप पुरोगामी विद्यार्थी संघटनांनी केला आहे. काही विद्यार्थ्यांना त्यांच्या घरी जाऊन ताब्यात घेतले जात असल्याचाही दावा करण्यात आला.

जन सम्राट टाईम्स | ब्रेक न्यूज

## खान्देशच्या सुपुत्राचा मराठवाड्यात गौरव

### डॉ. सैंदाणे यांना 'महा ॲक्युपंक्चर रत्न

जन सम्राट टाईम्स

**चोपडा| प्रतिनिधी:** जळगाव जिल्ह्यातील चोपडा तालुक्यातील *'वामन ॲक्युपंक्चर अॅण्ड नॅचरोपॅथी केंद्र'*चे संचालक डॉ. पृथ्वीराज सैंदाणे यांना आरोग्यसेवा क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल 'महा ॲक्युपंक्चर रत्न पुरस्कार २०२६' प्रदान करून गौरविण्यात आले. छत्रपती संभाजीनगर येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात १९ जुलै २०२६ रोजी आयोजित भव्य आणि दिमाखदार सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते हा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशन (AIMA) आणि AGMA यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमात ॲक्युपंक्चर व निसर्गोपचार क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या उपचारकांचा सन्मान करण्यात आला. आयुर्वेद, योग, सिद्ध, होमिओपॅथी, ॲक्युपंक्चर आणि निसर्गोपचार अशा विविध उपचार पद्धतींच्या प्रचार-प्रसारासाठी कार्य करणाऱ्या या संस्थांनी डॉ. सैंदाणे यांच्या कार्याची दखल घेत त्यांना हा पुरस्कार प्रदान केला.



डॉ. पृथ्वीराज सैंदाणे यांनी जळगाव जिल्ह्यात हजारो रुग्णांना ॲक्युपंक्चर आणि निसर्गोपचाराद्वारे उपचार देत आरोग्यसेवा क्षेत्रात मोलाचे योगदान दिले आहे. त्यांच्या या सेवाकार्याची दखल घेत त्यांचा प्रतिष्ठेच्या 'महा ॲक्युपंक्चर रत्न पुरस्कार २०२६' ने गौरव करण्यात आलाअभिनेते डॉ. सुयोग गोरेंद्र, अ‍ॅड. नाझिर काझी (प्रदेश अध्यक्ष, अल्पसंख्याक विभाग, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष), अ‍ॅड. दत्तात्रय जाधवर आणि अ‍ॅड. नागेश सोनुने उपस्थित होते.यावेळी डॉ. सतीश कराळे (चेअरमन), डॉ. नितीनराजे पाटील (व्हाईस चेअरमन), डॉ. बाबुराव कानडे (राष्ट्रीय अध्यक्ष), डॉ. अभिजीत कवठकर, डॉ. प्रशांत सावंत, डॉ. दिशा चव्हाण, डॉ. स्मिता खारकर, डॉ. विनोद ढोबळे, डॉ. सारंग फुके, डॉ. श्रीधर मेश्राम, डॉ. राजेंद्र गोरे, डॉ. तुषार वाघुळदे, डॉ. विजय पाटील यांच्यासह AIMA आणि AGMA चे पदाधिकारी तसेच अनेक वैद्यकीय तज्ज्ञ उपस्थित होते.

## भिमाईच्या लेकरांनी उपवर्गीकरणाच्या विरोधात महाएल्गार मोर्चातून नोंदवला विरोध

### भुसावळ शहरात भर पावसात निळ्या पाखरांची तीन तास हजारोंची उपस्थिती

जन सम्राट टाईम्स

**भुसावळ | प्रतिनिधी :** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अनुसूचित जातींसाठी १३ टक्के आरक्षणाची दिलेली चौकट सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या नावाखाली शासन मोडू पाहत आहे. यामुळेच अनुसूचित जाती उपवर्गीकरणाचा घाट घातल्या जात आहे. ५९ जाती एकसंध राहाव्यात, आणि आरक्षणाची चौकट मोडू नये, यासाठी भुसावळ शहरात मंगळवार, दि. २२ रोजी उप वर्गीकरणाविरोधात आंबेडकरी जनता रस्त्यावर उतरली.

शहरात दिनांक 22 जुलै बुधवार भर पावसात हजारोंच्या संख्येने आंबेडकरी अनुयायांचा हा भव्य विराट महामोर्चा नहाटा महाविद्यालय परिसरातून सुरू झाला. हा एल्गार महामोर्चा शहरातील प्रमुख मार्गावरून प्रांत कार्यालयावर धडकला. यावेळी भीमसैनिकांनी संविधान रक्षणाच्या घोषणा देत अनुसूचित जाती उप वर्गीकरणाचा निर्णय मागे घेण्याची मागणी केली. दरम्यान, दुपारी 12 वाजल्यापासून शहरातील आणि



ग्रामीण भागातील भीमसैनिक नहाटा महाविद्यालय परिसरात जमू लागले. दुपारी 2 वाजता या महामोर्चाला सुरुवात झाली.

अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने हा मोर्चा निघाला मोर्चाला शहर आणि ग्रामीण भागातील हजारोंच्या संख्येने समाज बांधव तसेच खास करून महिला भगिनींची उपस्थिती ही लक्षणीय होती.

यावेळी जय भीम, दिलं भीमानं खा गुमानं, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विजय असो, आरक्षण उप वर्गीकरण रद्द करा, अशा घोषणा देण्यात आल्या.

हा विराट एल्गार महामोर्चा अनुसूचित जाती आरक्षण उप वर्गीकरण विरोधी कृती समिती भुसावळ यांच्यावतीने आयोजित करण्यात आला होता

## एसआयआर (SIR) मोहिम : सोनवणे यांचा जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते गौरव

जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी :** एसआयआर (SIR) मोहिमेमध्ये उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल कल्याणे होळ जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक मा. श्री. राहुल सोनवणे यांचा जिल्हाधिकारी घुगे यांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. हा सन्मान त्यांच्या कर्तव्यनिष्ठा, परिश्रम आणि प्रशासनातील उल्लेखनीय योगदानाची दखल म्हणून प्रदान करण्यात आला. राहुल सोनवणे यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल शिक्षण क्षेत्रातून तसेच विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. एसआयआर (SIR) मोहिमेमध्ये उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल



कल्याणे होळ जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक मा. श्री. राहुल सोनवणे यांचा जिल्हाधिकारी घुगे यांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला.भविष्यातही त्यांनी अशीच उत्कृष्ट कामगिरी करत शाळेचे, गावाचे आणि जिल्ह्याचे नाव अधिक उज्ज्वल करावे, अशा शुभेच्छा व्यक्त करण्यात आल्या.

## ₹५.११ कोटींच्या जल जीवन मिशन योजनेतील कथित निकृष्ट व अपूर्ण कामांप्रकरणी १५ दिवसांत कारवाईची मागणी

जन सम्राट टाईम्स

**भडगाव | प्रतिनिधी :** जल जीवन मिशन अंतर्गत कजगाव (ता. भडगाव) येथे राबविण्यात येत असलेल्या ₹५ कोटी ११ लाख ९८ हजार (१८ टक्के जीएसटीसह) खर्चाच्या पाणीपुरवठा योजनेतील कथित निकृष्ट दर्जाचे, अपूर्ण व तांत्रिक मंजुरीच्या विरुद्ध झालेल्या कामांबाबत ग्रामपंचायत सदस्य पुंडलिक मधुकर सोनवणे यांनी जिल्हाधिकारी, जळगाव यांच्याकडे सविस्तर निवेदन सादर केले आहे. संबंधित ठेकेदार व अभियंत्यांवर तातडीने कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करत, १५ दिवसांत ठोस कारवाई न झाल्यास जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शांततापूर्ण बेमुदत उपोषण करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे. सोनवणे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनानुसार, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत या योजनेस ₹५,११,९८,००० खर्चास तांत्रिक मंजुरी देण्यात आली असून, १५,१३० नागरिकांना शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी प्रतिव्यक्ती सुमारे ₹३,३८४ इतका सार्वजनिक निधी खर्च करण्यात येत आहे. मात्र, एवढ्या मोठ्या निधीची योजना असूनही प्रत्यक्षात अनेक कामे निकृष्ट दर्जाची व अपूर्ण असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या संदर्भात ४ मार्च २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे लेखी तक्रार करण्यात आली होती. त्यानंतर २४ जून २०२६ रोजी संयुक्त चौकशी अधिकारी नियुक्त करण्यात आले. कार्यकारी अभियंत्यांनी सादर केलेल्या चौकशी अहवालात अनेक त्रुटींची नोंद करण्यात आल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे. निवेदनानुसार, सावदा–गिरणा नदीपात्रातील पाइपलाइन वाहून गेली असून, पारोळा रोडलगत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या रस्त्याशेजारी टाकलेली पाइपलाइन विस्कळीत अवस्थेत आहे. तसेच नवीन जॅकवेल सुमारे ३० ते ३५ फूट खोलीपर्यंतच आढळून आली असून, पंपगृहाचे बांधकाम पूर्ण झाल्याचे दिसून आलेले नाही. या सर्व बाबींची छायाचित्रेही जिल्हाधिकाऱ्यांकडे पुरावा म्हणून सादर करण्यात आल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. सोनवणे यांनी असा दावा केला आहे की, चौकशी अहवालात त्रुटींची नोंद असूनही संबंधित ठेकेदार, किंवा जबाबदार अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करण्यात आलेली नाही. तसेच शासनाच्या आर्थिक नुकसानीबाबत किंवा पुढील कारवाईबाबत स्पष्ट निष्कर्ष नोंदविण्यात आलेला नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

जन सम्राट टाईम्स | अँकर न्यूज

## मोटारसायकल चोरीच्या दोन गुन्ह्यांची उकल; तीन आरोपी निष्पन्न

### चाळीसगाव रोड पोलिसांची कारवाई; दोन मोटारसायकलींसह २० हजारांची रोकड हस्तगत

जन सम्राट टाईम्स

**धुळे । प्रतिनिधी:** चाळीसगाव रोड पोलीस ठाण्याच्या पथकाने मोटारसायकल चोरीच्या दोन गुन्ह्यांची यशस्वी उकल करत तीन आरोपी निष्पन्न केले आहेत. या कारवाईत एकूण १ लाख रुपयांच्या दोन मोटारसायकली आणि २० हजार रुपयांची रोकड हस्तगत करण्यात आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १७ ते १८ जुलै २०२६ दरम्यान फिर्यादी आबीद शब्बीर शाह (रा. तिरंगा चौक, म्युनिसिपल कॉलनी, धुळे) यांची ७० हजार रुपये किमतीची मोटारसायकल तसेच डिक्कीतील २० हजार रुपयांची रोकड अज्ञात चोरट्यांनी चोरून नेली होती. याप्रकरणी चाळीसगाव रोड पोलीस ठाण्यात



गुन्हा क्रमांक २१५/२०२६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. तसेच ८ जुलै २०२६ रोजी फिर्यादी हर्षल संजय कावळे (रा. चितोड रोड, धुळे) यांची ३० हजार रुपये किमतीची मोटारसायकल सत्यम वाईन शॉप रोडवरील मराठा बिर्याणी शॉपसमोरून चोरीला गेल्याने गुन्हा क्रमांक २१७/२०२६ दाखल करण्यात आला होता. तपासादरम्यान सहायक पोलीस निरीक्षक विवेक पवार यांना मिळालेल्या गोपनीय माहिती आणि सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे उमेर इरफान मन्सुरी (रा. पूर्व हुडको, धुळे) आणि फरदीन शेख लतीफ (रा. गुलशेर नगर, मालेगाव) यांना ताब्यात घेण्यात आले. चौकशीत त्यांनी मोटारसायकल व रोकड चोरीची कबुली दिल्यानंतर चोरीस गेलेली मोटारसायकल आणि रोख रक्कम जप्त करण्यात आली. दरम्यान, दुसऱ्या गुन्ह्याच्या तपासादरम्यान ऐंशीफुटी रोड परिसरात पेट्रोलिंग करत असताना एका संशयिताने पोलिसांना पाहताच मोटारसायकल सोडून पळ काढला. सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे त्याची ओळख हमीद रशीद अन्सारी (रा. मौलवीगंज नाल्याजवळ, धुळे) अशी पटली असून तो सराईत गुन्हेगार असल्याचे निष्पन्न झाले आहे. त्याचा शोध सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली. या कारवाईत तीन आरोपी निष्पन्न करून एक लाख रुपये किमतीच्या दोन मोटारसायकली आणि २० हजार रुपयांची रोकड हस्तगत करण्यात आली असून मोटारसायकल चोरीचे दोन्ही गुन्हे उघडकीस आणण्यात आले आहेत.


### २० हजार रुपयांची रोकड लंपास

ही कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी राजकुमार उपासे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक विवेक पवार तसेच पोलीस अंमलदार अविनाश वाघ, मनोज पाटील, ललिचंद चौधरी, अतिक शेख, शोएब बेग, सचिन पाटील, सिराज खाटीक आणि इंद्रजित वैराज यांनी केली.फिर्यादी आबीद शब्बीर शाह यांची ७० हजार रुपये किमतीची मोटारसायकल तसेच डिक्कीतील २० हजार रुपयांची रोकड अज्ञात चोरट्यांनी चोरून नेली होती. चाळीसगाव रोड पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक २१५/२०२६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलासंजय कावळे यांची ३० हजार रुपये किमतीची मोटारसायकल सत्यम वाईन शॉप रोडवरील मराठा बिर्याणी शॉपसमोरून चोरीला गेल्याने गुन्हा क्रमांक २१७/२०२६ दाखल करण्यात आला होता.

## जयश्रीताई वाघ यांची जिल्हा तक्रार निवारण समितीवर सदस्य म्हणून नियुक्ती

जन सम्राट टाईम्स

**यावल | प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासनाच्या महिला व बाल विकास विभागाने महिलांना कामाच्या ठिकाणी सुरक्षित, सन्मानजनक आणि भेदभावमुक्त वातावरण मिळावे तसेच लैंगिक छळाच्या तक्रारींवर प्रभावीपणे कार्यवाही व्हावी या उद्देशाने जिल्हास्तरीय स्थानिक तक्रार समित्यांवरील अशासकीय सदस्यांची सुधारित यादी जाहीर केली आहे. या यादीमध्ये लिनेस क्लब पाचोरा अध्यक्षा तथा श्री शेठ मुरलीधरजी मानसिंगका साहित्य, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, पाचोरा येथील प्राध्यापिका प्रा. सौ. जयश्रीताई कोमल वाघ यांची अशासकीय व्यक्तिगत सदस्या म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम, २०१३ अंतर्गत कार्यरत असलेल्या या समित्यांवर महिलांच्या तक्रारींची निष्पक्ष चौकशी करून त्यांना न्याय मिळवून देण्याची जबाबदारी असते. तसेच सुरक्षित कार्यसंस्कृती निर्माण करण्यासाठी जनजागृती, मार्गदर्शन आणि आवश्यक शिफारसी करण्याचे महत्त्वपूर्ण कार्यही समितीमार्फत केले जाते.



महिला व बाल विकास विभागाने यापूर्वीची सदस्य यादी कालबाह्य झाल्याने २० जुलै २०२६ रोजी सुधारित यादी प्रसिद्ध केली असून, त्याची अंमलबजावणी करण्याच्या सूचना राज्यातील सर्व संबंधित विभागांना देण्यात आल्या आहेत. अनुभवी, सामाजिक जाण असलेल्या आणि महिला सक्षमीकरणासाठी कार्यरत व्यक्तींना या समित्यांवर संधी देण्यामागे तक्रार निवारण यंत्रणा अधिक सक्षम आणि विश्वासार्ह करण्याचा शासनाचा उद्देश असल्याचे सांगण्यात आले आहे. भेदभावमुक्त वातावरण मिळावे तसेच लैंगिक छळाच्या तक्रारींवर प्रभावीपणे कार्यवाही व्हावी या उद्देशाने जिल्हास्तरीय स्थानिक तक्रार समित्यांवरील अशासकीय सदस्यांची सुधारित यादी जाहीर केली आहे.शैक्षणिक क्षेत्रातील प्रदीर्घ अनुभव, सामाजिक उपक्रमांतील सक्रिय सहभाग आणि महिला सक्षमीकरणासाठी सातत्याने केलेल्या कार्याची दखल घेत प्रा. सौ. जयश्रीताई वाघ यांची या महत्त्वाच्या जबाबदारीसाठी निवड करण्यात आली आहे.

# चार महिने उलटले तरी अंधारात! कासारखेड्यात ट्रान्सफॉर्मर बसवला, पण वीज वाहिनी अजूनही 'लटकलेली'

## 'आधी वीजपुरवठा सुरळीत करा, मगच स्मार्ट मीटर बसवा'; ग्रामस्थांचा सवाल

जन सम्राट टाईम्स

**कासारखेडा (ता. यावल, जि. जळगाव)| |प्रतिनिधी :** गावात सुरळीत वीजपुरवठा व्हावा यासाठी महावितरण कंपनीने नवीन ट्रान्सफॉर्मर मंजूर करून तो बसवला. मात्र, तब्बल चार महिने उलटूनही या ट्रान्सफॉर्मरला मुख्य वीज वाहिनी जोडण्यात आलेली नसल्याने कासारखेडा येथील ग्रामस्थांना आजही अपुऱ्या वीजपुरवठ्याचा सामना करावा लागत आहे. महावितरणच्या कथित दिरंगाईमुळे गावातील नागरिकांमध्ये तीव्र नाराजी असून, ओव्हरलोड झालेल्या जुन्या ट्रान्सफॉर्मरवरच संपूर्ण गावाचा भार असल्याने वारंवार वीजपुरवठा खंडित होणे आणि ट्रान्सफॉर्मर ट्रिप होण्याच्या समस्या कायम आहेत. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, चार महिन्यांपूर्वी नवीन ट्रान्सफॉर्मर उभारण्यात आला. त्यासाठी मुख्य वीज लाईनचे खांबही उभारण्यात आले आहेत. मात्र, अद्याप त्या खांबांवर मुख्य वीज वाहिनी जोडण्यात आलेली नसल्याने ट्रान्सफॉर्मर सुरूच करण्यात आलेला नाही. 'आधी वीजपुरवठा सुरळीत करा, मगच स्मार्ट मीटर बसवा' एकीकडे गावात मुख्य वीज वाहिनीचे काम महिनोनमहिने रखडलेले असताना, दुसरीकडे स्मार्ट मीटर बसविण्याची घाई सुरू असल्याने ग्रामस्थांनी संताप व्यक्त केला आहे. "महावितरणने आधी गावातील वीजपुरवठा पूर्णपणे सुरळीत करावा, नवीन ट्रान्सफॉर्मरला मुख्य लाईन जोडून




तो कार्यान्वित करावा आणि त्यानंतरच स्मार्ट मीटर बसवावेत," अशी ठाम मागणी ग्रामस्थांनी केली आहे. या समस्येमुळे रात्रीच्या वेळी वीज नसणे किंवा कमी दाबाने वीजपुरवठा होणे, याचा विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर परिणाम होत आहे. उकाडा आणि पावसाळ्यात ज्येष्ठ नागरिक व लहान मुलांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. विजेअभावी घरातील आवश्यक उपकरणेही बंद राहत असल्याने नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर परिणाम होत आहे.

### आंदोलनाचा इशारा

संबंधित कंत्राटदार आणि महावितरणच्या अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळेच हे काम रखडल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. "फक्त खांब गाडून आणि ट्रान्सफॉर्मर उभा करून तो शोभेची वस्तू बनवली आहे का?" असा सवाल उपस्थित करत, महावितरणने तातडीने मुख्य वीज वाहिनी जोडून ट्रान्सफॉर्मर कार्यान्वित न केल्यास यावल येथील महावितरण कार्यालयावर धडक मोर्चा काढण्यात येईल, असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

### नागरिकांमध्ये तीव्र नाराजी

मात्र, तब्बल चार महिने उलटूनही या ट्रान्सफॉर्मरला मुख्य वीज वाहिनी जोडण्यात आलेली नसल्याने कासारखेडा येथील ग्रामस्थांना आजही अपुऱ्या वीजपुरवठ्याचा सामना करावा लागत आहे. महावितरणच्या कथित दिरंगाईमुळे गावातील नागरिकांमध्ये तीव्र नाराजी असून, ओव्हरलोड झालेल्या जुन्या ट्रान्सफॉर्मरवरच संपूर्ण गावाचा भार असल्याने वारंवार वीजपुरवठा खंडित होणे आणि ट्रान्सफॉर्मर ट्रिप होण्याच्या समस्या कायम आहेत. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, चार महिन्यांपूर्वी नवीन ट्रान्सफॉर्मर उभारण्यात आला. त्यासाठी मुख्य वीज लाईनचे खांबही उभारण्यात आले.

# १३ वर्षीय अल्पवयीन मुलीवर अत्याचार!


जन सम्राट टाईम्स

**नंदुरबार | प्रतिनिधी:** नशिराबाद परिसरातून एक अतिशय संतापजनक आणि अत्यंत गंभीर प्रकार समोर आला आहे. अवघ्या १३ वर्षीय अल्पवयीन मुलीला गोडगोड बोलून आणि चिकू खाण्याचे आमिष दाखवून एका नराधमाने बळकावून नेत तिच्यावर अतिप्रसंग केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी पीडित मुलीच्या आईने दिलेल्या फिर्यादीवरून सुनील सावके (रा. गोदावरी हॉस्पिटल कॅम्पस, सुपरवायझर) या संशयिताविरुद्ध पोस्को कायद्याच्या विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आरोपीने अल्पवयीन मुलीला अमिषास बळी पाडून तिला परिसरातील चिकूच्या मळ्यात नेले आणि तिच्यावर अत्याचार केला. हा प्रकार उघडकीस आल्यानंतर परिसरात मोठी खळबळ उडाली असून नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे. गुन्ह्याची गांभीर्यता पाहता, जळगाव जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक संदीप गावित आणि भुसावळ विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी केदार बारबोले यांच्या मार्गदर्शनाखाली तातडीने सूत्रे हलवण्यात आली आहेत. स्थानिक पोलीस ठाण्याच्या सहायक पोलीस निरीक्षक श्रीमती योगिता नारखेडे यांच्या पथकातील पोलीस उपनिरीक्षक विजय कोळी यांच्याकडे या गुन्ह्याचा सखोल तपास सोपवण्यात आला आहे. पोलीस उपनिरीक्षक विजय कोळी हे पथकातील सहकारी कर्मचारी गुणवंत देशमुख, भरत बाविस्कर, पंकज सोनवणे, सागर भिडे, आरिफ तडवी, रामकृष्ण माळी, प्रवीण लोहार आणि भूषण पाटील यांच्यासह या प्रकरणाचा कसून शोध घेत आहेत. पीडित मुलीला न्याय मिळवून देण्यासाठी आणि आरोपीच्या मुसक्या आवळण्यासाठी पोलीस प्रशासनाकडून रात्री उशिरापर्यंत कायदेशीर व तातडीची कारवाई सुरू होती.

जन सम्राट टाईम्स — ब्रेक न्यूज

# ज्ञानदेव नगर परिसरातील खड्ड्यांमुळे रस्त्याची दुर्दशा

## तातडीने दुरुस्तीची नागरिकांची मागणी



जन सम्राट टाईम्स

**नशिराबाद | प्रतिनिधी :** जुना नशिराबाद रोडवरील १०० फूट रोडलगत असलेल्या ज्ञानदेव नगरकडे जाणाऱ्या मार्गाची अत्यंत दयनीय अवस्था झाली असून, ठिकठिकाणी पडलेल्या मोठमोठ्या खड्डयांमुळे नागरिक आणि वाहनधारकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. सततच्या पावसामुळे खड्डयांमध्ये पाणी साचल्याने त्यांच्या खोलीचा अंदाज येत नसून, अपघातांचा धोका वाढला आहे. रस्त्यावरील डांबरीकरण पूर्णपणे उखडल्याने संपूर्ण मार्गाची चाळण झाली आहे. अपघातांचा वाढता धोका या मार्गावर पडलेल्या खड्डयांमुळे द्विचाकीस्वार वारंवार घसरून पडत असल्याच्या घटना घडत आहेत. रात्रीच्या वेळी अपुऱ्या प्रकाशामुळे परिस्थिती अधिक गंभीर बनत असून अपघाताचा धोका दुप्पट झाला आहे. तसेच पादचाऱ्यांना चिखल आणि साचलेल्या पाण्यातून मार्ग काढावा लागत असल्याने मोठी गैरसोय होत आहे. प्रशासनाच्या दुर्लक्षाविरोधात नागरिकांमध्ये नाराजी ज्ञानदेव नगरकडे जाणाऱ्या या मार्गावरून दररोज शेकडो नागरिक, शाळकरी विद्यार्थी आणि वाहनधारकांची ये-जा असते. मात्र, रस्त्याची एवढी दयनीय अवस्था होऊनही प्रशासनाकडून कोणतीही ठोस दुरुस्ती करण्यात आलेली नसल्याने स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. स्थानिक नागरिकांनी प्रशासनाने तातडीने या रस्त्याची दखल घेऊन खड्डे बुजवावेत आणि संपूर्ण रस्त्याची दुरुस्ती करावी, जेणेकरून भविष्यात होणारे अपघात टाळता येतील, अशी मागणी केली आहे.

### अपघाताचा धोका दुप्पट झाला

रस्त्यावरील डांबरीकरण पूर्णपणे उखडल्याने संपूर्ण मार्गाची चाळण झाली आहे. अपघातांचा वाढता धोका या मार्गावर पडलेल्या खड्डयांमुळे द्विचाकीस्वार वारंवार घसरून पडत असल्याच्या घटना घडत आहेत. रात्रीच्या वेळी अपुऱ्या प्रकाशामुळे परिस्थिती अधिक गंभीर बनत असून अपघाताचा धोका दुप्पट झाला आहे.

# भीमस्मृती धम्म पदयात्रेचे पाळधीत जल्लोषात स्वागत

## भर पावसातही अनुयायांचा उत्साह कायम

जन सम्राट टाईम्स

**पाळधी, ता. धरणगाव | प्रतिनिधी :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ऐतिहासिक स्मृतींना उजाळा देण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या १०० किलोमीटर भीमस्मृती धम्म पदयात्रेचे पाळधी (ता. धरणगाव) येथे मोठ्या जल्लोषात स्वागत करण्यात आले. सामाजिक समता, बंधुता आणि भगवान गौतम बुद्धांच्या धम्माचा संदेश जनतेपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने भंते नागसेन सातपुडा पर्वत यांच्या नेतृत्वाखाली ही पदयात्रा काढण्यात आली आहे.

ही धम्म पदयात्रा २१ जुलै ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक, रेल्वे स्टेशन जळगाव ते लांडोर बंगला, धुळे या ऐतिहासिक मार्गावर आयोजित करण्यात आली आहे. जळगाव येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करून पदयात्रेला प्रारंभ झाला.,पदयात्रेला ज्ञानज्योती मातेरो ताडोबा अभयारण्य, चंद्रपूर यांचे मार्गदर्शन लाभत असून देशभरातील अनेक मान्यवर भिक्खू संघ व धम्म अनुयायी सहभागी झाले आहेत. भंते प्रिय बोधी, भंते चार धम्मो, भंते सुगत बुद्धी, भंते सागर, भंते धम्मज्योती, भंते आनंद, भंते धम्मरत्न, भंते संघरक्षित, भंते आर्यनाग आणि भंते सुमित मोदी यांच्यासह अनेक धम्म प्रचारकांचा सहभाग आहे. पाळधीत अनुयायांनी केले उत्स्फूर्त स्वागत २१ जुलै रोजी सायंकाळी भीमस्मृती धम्म पदयात्रा पाळधी येथे दाखल झाली. यावेळी बौद्ध उपासक-उपासिकांनी पुष्पवृष्टी, घोषणाबाजी आणि उत्साहपूर्ण वातावरणात यात्रेचे स्वागत केले. रात्री पाळधी येथे पदयात्रेचा मुक्काम झाला.



### स्वागतासाठी मान्यवरांची उपस्थिती

धम्म पदयात्रेच्या स्वागत कार्यक्रमास शिवसेना मागासवर्गीय सेनेचे जिल्हाप्रमुख तथा माजी सभापती मुकुंदराव नन्नवरे, माजी सरपंच चंद्रवणी नन्नवरे, चैतन्य नन्नवरे, विजय सपकाळे, विजय वाघ, किरण नन्नवरे, रतन अडकमोल, प्रणय नन्नवरे, गोकुळ केदार, बाळा नन्नवरे, अशोक नन्नवरे, सुभाष नन्नवरे, संजय जाधव, बेबा ताई नन्नवरे, शारदा सोनवणे, संगीता साळुंखे, भारती नन्नवरे यांच्यासह मोठ्या संख्येने बौद्ध उपासक-उपासिका उपस्थित होते.

# पाचोऱ्यात आंतरराष्ट्रीय हिंदू परिषद–राष्ट्रीय बजरंग दलात जम्बो प्रवेश!

## योगेश पाटील जळगाव जिल्हा उपाध्यक्षपदी

जन सम्राट टाईम्स

**पाचोरा | प्रतिनिधी:** आंतरराष्ट्रीय हिंदू परिषद व राष्ट्रीय बजरंग दलाचे संस्थापक अध्यक्ष तसेच अयोध्येतील प्रभू श्रीराम मंदिर आंदोलनाचे प्रमुख नेते डॉ. प्रवीण तोगडिया यांच्या हिंदुत्ववादी विचारसरणीवर विश्वास व्यक्त करत देवगिरी प्रांतातील अनेक कार्यकर्त्यांनी आंतरराष्ट्रीय हिंदू परिषद–राष्ट्रीय बजरंग दलात जम्बो प्रवेश केला. या कार्यक्रमात पाचोरा येथील सामाजिक कार्यकर्ते योगेश भाऊ पाटील यांची जळगाव जिल्हा उपाध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली.



तसेच भूपेंद्र नंदलाल बेलदार यांच्याकडे सोशल मीडिया प्रमुख पदाची जबाबदारी सोपविण्यात आली. याशिवाय खुशी दिदी (प्रवीण गरुड) यांची किन्नर आखाडा प्रमुख, मृत्युंजय गायकवाड यांची ओजस्विनी महिला तालुकाप्रमुख, तर नितीन वाकोडे, बंटी पाटील, सागर पाटील, गौरव पाटील, आदेश पाटील आणि जय बागुल यांची शहर मंत्री म्हणून नियुक्ती जाहीर करण्यात आली. तसेच भूषण कुंभार, कृष्णा पाटील, संदीप भाऊ चौधरी, रोहित पाटील आणि सोपान शिंपी यांची सहमंत्री म्हणून निवड करण्यात आली. सोयगाव प्रखंडातून आप्पा भाऊ वाघ आणि ईश्वर भाऊ सपकाळे, भडगाव शहरातून भद्रा भाऊ माळी व बंटी धनगर, तसेच एरंडोल प्रखंडातून चेतन भाऊ चौधरी यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी संघटनेत प्रवेश केला. या कार्यक्रमात पाचोरा येथील सामाजिक कार्यकर्ते योगेश भाऊ पाटील यांची जळगाव जिल्हा उपाध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली. तसेच भूपेंद्र नंदलाल बेलदार यांच्याकडे सोशल मीडिया प्रमुख पदाची जबाबदारी सोपविण्यात आली. या कार्यक्रमाला प्रवीण कोळी (राष्ट्रीय बजरंग दल, जळगाव जिल्हा मंत्री), महंत कमल गिरी महाराज (नागा बाबा आखाडा), राहुल सुनील चौधरी (राष्ट्रीय बजरंग दल, जळगाव जिल्हा ग्रामीण अध्यक्ष), अविनाश कुलकर्णी (आंतरराष्ट्रीय हिंदू परिषद–राष्ट्रीय बजरंग दल, देवगिरी प्रांत, जळगाव जिल्हा सहमंत्री), संतोष भाऊ सोनवणे (४० गाव तालुका उपाध्यक्ष) तसेच रोशनी छझलाने (ओजस्विनी महिला आघाडी) यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमात नव्याने नियुक्त करण्यात आलेल्या पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. उपस्थितांनी संघटन विस्तार, सामाजिक कार्य आणि हिंदुत्ववादी विचारांचा प्रसार करण्याचा निर्धार व्यक्त केला.

# सीसीटीव्ही कॅमेऱ्याला सॉक्स घालून शटर तोडत चोरट्यांचा डाव यशस्वी; भरवस्तीतील घटनेने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

जन सम्राट टाईम्स

**पहूर ता. जामनेर। प्रतिनिधी:** पहूर कसबे येथील साई ज्वेलर्स या सराफा दुकानात अज्ञात चोरट्यांनी चोरी करत सुमारे ६० हजार रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना मंगळवारी सकाळी उघडकीस आली आहे. पहूर बस स्थानकाजवळ असलेल्या अर्जुन रामदास सोनवणे यांच्या साई ज्वेलर्स या सराफा दुकानात अज्ञात चोरट्यांनी मध्यरात्री



ते मंगळवारी सकाळी चार वाजेच्या दरम्यान शटर तोडून प्रवेश केला. चोरीपूर्वी चोरट्यांनी सीसीटीव्ही कॅमेऱ्याला सॉक्स घालून त्याची नोंद होऊ नये, यासाठी खबरदारी घेतल्याचे समोर आले आहे. त्यानंतर दुकानातील सुमारे ६० हजार रुपयांचा ऐवज लंपास करून चोरटे पसार झाले. भरवस्तीतील सराफा दुकान फोडून चोरी झाल्याने परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. याप्रकरणी साई ज्वेलर्सचे संचालक अर्जुन रामदास सोनवणे यांच्या फिर्यादीवरून पहूर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, भरवस्तीत घडलेल्या या चोरीमुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# धुळे येथे धावत्या शिवशाही बसला आग

## चालकामुळे ४९ प्रवाशांचे प्राण वाचले



जन सम्राट टाईम्स

**धुळे | प्रतिनिधी :** धुळे येथे नांदुरबारहून धुळ्याकडे येणाऱ्या शिवशाही बसला अचानक भीषण आग लागल्याची घटना घडली. चालकाच्या प्रसंगावधानामुळे बसमधील ४९ प्रवाशांना सुरक्षित बाहेर काढण्यात यश आले आणि एक मोठी दुर्घटना टळली. ही घटना धुळे जिल्ह्यातील नागवाबारीजवळील सातपुडा शाळेसमोर दुपारी १२:३० ते १२:४५ वाजण्याच्या सुमारास घडली. प्राथमिक माहितीनुसार, बसच्या बोनेटमधील बिघाडामुळे आग लागली. बोनेटमधून धूर येत असल्याचे चालकाच्या लक्षात येताच त्यांनी तत्काळ बस थांबवून सर्व प्रवाशांना खाली उतरवले. काही मिनिटांतच आगीने रौद्ररूप धारण करत संपूर्ण बसला वेढले. आगीत शिवशाही बस पूर्णपणे जळून खाक झाली. मात्र चालकाच्या तत्परतेमुळे बसमधील सर्व ४९ प्रवाशांचे प्राण वाचले. आगीची माहिती मिळताच धुळे महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाने घटनास्थळी धाव घेत अथक प्रयत्नांनंतर आग आटोक्यात आणली. या घटनेमुळे काही काळ महामार्गावर नागरिकांची मोठ्या प्रमाणात गर्दी झाली होती. नंदुरबार आगारातून सकाळी ही शिवशाही बस ४९ प्रवाशांना घेऊन धुळ्याकडे रवाना झाली होती. धुळ्यात प्रवेश करतानाच नागवाबारी परिसरात बसच्या बोनेटमध्ये बिघाड होऊन आग लागल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. प्राथमिक माहितीनुसार, बसच्या बोनेटमधील बिघाडामुळे आग लागली. बोनेटमधून धूर येत असल्याचे चालकाच्या लक्षात येताच त्यांनी तत्काळ बस थांबवून सर्व प्रवाशांना खाली उतरवले. काही मिनिटांतच आगीने रौद्ररूप धारण करत संपूर्ण बसला वेढले. आगीत शिवशाही बस पूर्णपणे जळून खाक झाली. मात्र चालकाच्या तत्परतेमुळे बसमधील सर्व ४९ प्रवाशांचे प्राण वाचले. या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी बसचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, आगीच्या नेमक्या कारणाचा पुढील तपास सुरू आहे.

# अनुसूचित जाती उपवर्गीकरण धोरणाविरोधात 'भारतीय संविधान सेना'चे आंदोलन

## SC/ST हक्कांच्या संरक्षणासाठी राष्ट्रपती, राज्यपाल व मुख्यमंत्र्यांना निवेदन

जन सम्राट टाईम्स

**धुळ | प्रतिनिधी :** अनुसूचित जातींमध्ये 'अ, ब, क, ड' असे उपवर्गीकरण करण्याच्या राज्य शासनाच्या धोरणाला विरोध करत भारतीय संविधान सेना आणि विविध सामाजिक संघटनांच्या वतीने 'संविधान जागर आंदोलन' सुरू करण्यात आले आहे.

या आंदोलनाच्या माध्यमातून राज्य सरकारने उपवर्गीकरणाचा निर्णय रद्द करावा तसेच न्यायमूर्ती बदर समितीचा अहवाल आणि त्यामागील सांख्यिकीय माहिती तातडीने सार्वजनिक करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. भारतीय संविधान सेनेचे संस्थापक अध्यक्ष आनंद साहेबराव लोंढे यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रपती, राज्यपाल, मुख्यमंत्री, सामाजिक न्याय मंत्री तसेच राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोग यांना जिल्हाधिकाऱ्यांमार्फत निवेदन देण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की, भारतीय संविधानाच्या कलम ३४१ अंतर्गत अनुसूचित जातींना एकसंध घटक म्हणून घटनात्मक संरक्षण देण्यात आले आहे. सामाजिक विषमता आणि शोषणातून मुक्तीसाठी निर्माण झालेली ही एकजूट उपवर्गीकरणामुळे तुटण्याची भीती संघटनेने व्यक्त केली आहे. राज्य सरकारकडून राबविण्यात येणारे 'अ, ब, क, ड' उपवर्गीकरण धोरण सामाजिक ऐक्याला बाधा आणणारे असल्याचा आरोप भारतीय संविधान सेनेने केला आहे.




### स्वतंत्र वैधानिक कायदा करण्याची मागणी

महाराष्ट्रात हे धोरण लागू करण्यामागे राजकीय हेतू असल्याचा आरोप संघटनेने केला आहे. बदर समितीचा अहवाल सार्वजनिक करण्याची मागणी अनुसूचित जाती उपवर्गीकरणाचा अभ्यास करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या न्यायमूर्ती बदर समितीचा अहवाल अद्याप सार्वजनिक करण्यात आलेला नाही. अहवाल आणि संबंधित आकडेवारी उपलब्ध न करून निर्णय प्रक्रिया राबविणे हे पारदर्शकतेच्या तत्त्वांच्या विरोधात असल्याचे संघटनेने म्हटले आहे. त्यामुळे समितीचा संपूर्ण अहवाल तातडीने जनतेसमोर आणावा, अशी मागणी करण्यात आली आहे. SC/ST निधी संरक्षणासाठी स्वतंत्र कायद्याची मागणी अनुसूचित जाती व जमातींसाठी राखीव असलेल्या उपयोजना निधीचा इतर कामांसाठी वापर होत असल्याचा आरोप करत, SC/ST निधी संरक्षणासाठी स्वतंत्र वैधानिक कायदा करण्याची मागणी करण्यात आली आहे.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306